गोदातीर दिनांक 29/12/2025

# शहरात दहशत पसरवणाऱ्या तिघांना भाग्यनगर पोलिसांनी केली अटक

## दोन तलवारीसह तीन दुचाकी जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)**– शहराच्या भाग्यनगर व अन्य पोलीस ठाण्याच्या हद्दीत विना-परवाना बेकायदेशीररित्या हातात तलवारी घेऊन दहशत पसरवणाऱ्या कल्याणनगर येथील तीन युवकांना भाग्यनगर पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून तीन दुचाकी आणि दोन धारदार तलवारी जप्त केल्या आहेत. तिघांविरुद्ध भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली २७ डिसेंबर रोजी करण्यात आली.

शनिवार, दि. २७ डिसेंबर रोजी दुपारी एकच्या सुमारास भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक विनोद देशमुख व त्यांचे सहकारी कॅनॉल रोडने पेट्रोलींग करीत असताना जयभवानी चौक कल्याणनगर येथे आरोपी रवी चंद्रकांत बुक्तरे (वय २२), रवीकिरण गौतम कांबळे (वय २८) आणि शुभम किरण गायकवाड (वय २८ सर्व राहणार कल्याणनगर) हे अवैधरित्या दोन तलवार ताब्यात बाळगून सार्वजनिक ठिकाणी आपापसात मारामारी करून शांतता भंग करीत असल्याचे पोलिसांना समजले. गुन्हे शोध पथकाने त्यांना ताब्यात घेऊन त्यांच्या ताब्यातून दोन तलवारी व तीन दुचाकी असा एकूण २ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून त्यांच्यावर विनोद देशमुख यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. तपास हवालदार कांबळे करत आहेत.

# अवैध कत्तलीसाठी जाणारे १० बैल पोलिसांनी पकडले; चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल



**नांदेड (प्रतिनिधी)**– अवैध कत्तलीसाठी एका वाहनात कोंबून दहा जनावरांची (बैल) वाहतूक होत असल्याची माहिती नांदेड ग्रामीण पोलिसांना मिळताच त्यांनी सापळा लावून सदरचे वाहन धनेगाव पुलाखाली पकडले. यावेळी त्या वाहनातील दहा गोवंशाची सुटका करून चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

नांदेड ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या पथकाने मिळालेल्या माहितीवरून धनेगाव पुलाखाली सापळा लावला. यावेळी एक आयचर वाहन क्र. (MH२६-BE-४९४६) किंमत १२ लाख रुपये ज्यात दहा गोवंश जातीचे बैल किंमत ५ लाख ३० हजारांचे असा एकूण १७ लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस आमदार मारुती पचलिंग यांच्या फिर्यादीवरून आरोपी जबीउल्लाखान जहीरउल्लाखान (वय २५ राहणार खुदबेनगर), मोहम्मद सर्वर मोहम्मद गौस (वय ३७ राहणार टायर बोर्ड हिलाल नगर) शेख कलीम कुरेशी दबकपूल हमीदिया कॉलनी आणि शेख उमर कुरेशी राहणार परभणी यांच्याविरुद्ध कलम ५(A), B ९(A), B महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ व ११(१) (A) प्राण्याचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० कलम ३(५) BNS प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेल्या कामगिरीचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी कौतुक केले आहे.